सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
माहितीचा अधिकार

# शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, मुंबई

सेंट जॉर्जेस् रुग्णालय आवार, पी. डीमेलो रोड, फोर्ट, मुंबई - ४०० ००१

फोन नं. ०२२-२२६२०६६८, ६९, ७० फॅक्सः ०२२-२२६२०७८९ संकेत स्थळ: www.gdcmumbai.org


क्र.शादंमवरुमु/विवि/सुचना/ /२०१७ दि.११/०८/२०१७

## कार्यालयीन सूचना

सर्व संबधीतांना कळविण्यात येते की, ज्या उमेदवारांना शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, मुंबई येथे बाहय आंतरवासिता ( Externship ) म्हणून महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशिक मार्फत शिफारशीची मान्यता घ्यायची आहे अशा सर्व उमेदवारांनी खालील अटी व शर्तीच्या आधिन राहून सोमवार दि.२१/०८/२०१७ पूर्वी अथवा त्या दिवशी संध्याकाळी ठिक ४.३० वाजेपर्यत विद्यापीठाने दिलेल्या नमून्यात अर्ज दाखल करणे बंधनकारक राहील. सदर दिनांकानंतर अर्ज स्वीकारले जाणार नाहीत, यांची नोंद घेण्यात यावी.

अटी व शर्ती

१) अर्ज करतेवेळी विद्यार्थ्यांने ज्या महाविद्यालयातून बीडीएस पूर्ण केले आहे त्या महाविद्यालयाची ना हरकत प्रमाणपत्र (स्वप्रमाणित छायांकित प्रत Xerox self attested) सादर करणे बंधनकारक राहील. जेणेकरुन आपणास दुस-या इतरत्र महाविद्यालयास अर्ज सादर करणे सोयीचे होईल.

२) जे विद्यार्थी महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक व्यतिरिक्त कोणत्याही विद्यापीठातून बीडीएस उत्तीर्ण झाले असतील, अश्या विद्यार्थ्यांनी संबंधित विद्यापीठाचे ना हरकत प्रमाणपत्राची छायांकित प्रत सादर करणे बंधनकारक राहील.

३) भारतीय दंत परिषदेच्या धोरणानुसार / संचालकांचे मार्गदर्शन पत्र (दि.१२.०२.२०१५) / महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक अधिसूचना क्र.०६/२०१२ व सद्यःस्थितीत कार्यरत आंतरवासियता / बाहय आंतरवासियता संख्या यांचा तुलनात्मक विचार करुन मर्यादित विद्यार्थ्यांना गुणवत्तेनुसार ना हरकत प्रमाणपत्र दिले जाईल.

४) संबंधितांना सुचित करण्यात येते की अर्ज सादर केला म्हणजे ना हरकत प्रमाणपत्र मिळेल असे गुहीत धरु नये.

५) सोमवार दिनांक २१.०८.२०१७ रोजी ४.३० नंतर अर्ज स्वीकारले जाणार नाहीत यांची नोंद घेण्यात यावी.

अधिष्ठाता,
शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, मुंबई.

प्रति, १) मा.सचिव, वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.
२) मा. कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक.
३) मा संचालक , वैद्यकिय शिक्षण व संशोधन, मुंबई.

शासकीय दंत महाविद्यालय आणि रुग्णालय Government Dental College & Hospital Mumbai मुंबई 400 001